# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/03/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## G-20 सभासद नागपूर ग्रामीण जिल्हा दौरा चोख बंदोबस्त

दिनांक २२/०३/२०२३ रोजी G-20 सभासद हे नियोजित कार्यक्रम अनुसार जगातील प्रसिद्ध पेंच व्याघ्र प्रकल्पला भेट देण्याकरीता जाणार आहेत. तसेच त्यासोबत गो अनुसंधान केंद्र देवलापार येथे सुद्धा भेट देणार आहे. सन्माननीय सदस्यांचे सदर दौरा कार्यक्रम करीता नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर पोलीस दलातर्फे योग्य तो बंदोबस्त श्री. विशाल आनंद पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर यांचे मार्गदर्शनात खालीलप्रमाणे अधिकारी व अंमलदार यांचे साध्या व पारंपारिक गणवेषात बंदोबस्त डयुटी लावण्यात आलेली आहे.

१) बंदोबस्त प्रभारी अधिकारी:– डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर

२) एकुण बंदोबस्त पोलीस अधिकारी:– २१

३) एकुण बंदोबस्त पोलीस अंमलदार:– १७९

मा. G-20 सभासद यांचे नमुद दौरा कार्यक्रम दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही. तसेच दौरा कार्यक्रम दरम्यान क्षेत्रातील नागरीकांना कोणतेही असुविधा होणार नाही याबाबत सर्व बंदोबस्त अधिकारी व अंमलदारांना योग्य तो सुचना देण्यात आले आहे.

## पोलीस शिपाई (चालक) लेखी परीक्षा

सन २०२१ पोलीस शिपाई भरतीमध्ये पोलीस शिपाई (चालक) पदासाठी लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा (मुंबई शहर वगळता) दिनांक २६/०३/२०२३ रोजी सकाळी ०८.३० वा. घेण्यात येणार आहे. पोलीस शिपाई (चालक) पदासाठी विविध घटकांत (मुंबई शहर वगळता) लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र हे महाआयटी विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करण्यास उपलब्ध आहे. सदर परीक्षा केंद्रावर उमेदवारांनी ०२ (दोन) तास अगोदर पोहोचणे आवश्यक आहे. यासंदर्भात उमेदवारांना काही अडचण /समस्या असल्यास त्यांनी संबंधित घटक प्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

## फसवणुक करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बुट्टीबोरी :–** यातील फिर्यादी नामे– गोपाल रामलालजी श्रीवास, वय ४८ वर्ष रा. बोरी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अप क्र. ६३/२००५ कलम ४२०, ४६८, १२०(ब), ३४ भादवि सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी नामे– १) मनीष काशीनाथ लोकरस, वय ३२ वर्ष रा. चंद्रपुर (फरार आरोपी) २) अन्थोनि विल्सन सिमन्स, वय २५ वर्ष रा. गांधीनगर जि. चंद्रपुर ३) अनील मोतीराम वर्मा, वय २४ वर्ष, रा. चंद्रपुर (आरोपी मयत) ४) दिगांबर विठोबाजी रेवतकर, वय ३७ वर्ष रा. बोरी यांनी संगनमत करून एस. एम. एल फायनान्स कारपोरेशन कंपनी दवारे कर्ज मिळवुन देण्याचे आमीश दाखवुन फिर्यादी तसेच गावकरी लोकांकडुन पैसे घेवुन ३,७०,०००/– रू ची फसवणुक केली.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि पिंदुरकर पोस्टे बोरी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक २०/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश करमकर सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. २ व ४ यांना कलम १२०(ब) भादंवि मध्ये ६ महीने सश्रम कारावास व कलम ४२०, ३४ भादंवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रू दंड व दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास तसेच एमपीआयडी कलम ३ मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास प्रत्येकी ३५०००/–रू दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. सदर गुन्हयात फरार आरोपीताचे विरोधात पुरवणी दोषारोप पत्र दाखल करण्याचे आदेशित केले आहे.

सरकारचे वतीने एपीपी पान्डे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोहवा/३८४ मधुकर सुरपाम पो.स्टे. बुटीबोरी यांनी मदत केली आहे.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कन्हान :–** यातील फिर्यादी नामे– शैलेश प्रकाश भोयर, वय २२ वर्ष रा. धरमनगर कन्हान यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप क्र. १०२/२०१७ कलम ३०२, ३०७, ४५२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील **मृतक नामे– सौ. रसीका बबन ठाकरे, वय २३ वर्ष रा. धरमनगर कन्हान** हि फिर्यादीची बहिण होती. मृतकचे तिच्या पतीशी पटत नसल्याने मृतक हि आपल्या भावाच्या घरी राहात होती. **आरोपी नामे– प्रकाश तुळशीराम मेश्राम, वय ४१ वर्ष रा. शिवाजी नगर कन्हान** हा मृतकच्या भावाचा मित्र असुन आरोपीचे घरी येणे जाणे होते. आरोपी हा मृतकला नेहमी तु माझ्याशी लग्न कर असे म्हणुन धमकी देत होता. आरोपीला लग्नासाठी मृतक ही नेहमी नकार देत असुन नुमद घटना वेळी व ठिकाणी आरोपी याने फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीचे मृतक बहीणीला तु माझेशी लग्न करण्यास नकार का दिला. याकारणावरून फिर्यादीच्या मृतक बहीणीच्या पोटावरती जिवे मारण्याचा उददेशाने चाकुने वार करून गंभीर जख्मी केले. उपचारादरम्यान जख्मी मरण पावल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा नोद करण्यात आला.

सदर प्रकरणाचे तपास पोउपनि राजेद्र पाली पोस्टे कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिनांक २१/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश यांनी वरील नमुद कलम ३०२ भादवि मध्ये आजीवन कारावास व २५,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद कलम ४५२ भादवि मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व ५०००/–रू दंड व दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोशी /१४६८ अहमद पोस्टे कन्हान यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**